महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ 20 मार्च 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 262 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

थोडक्यात महत्वाचे

जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली

## राजकीय पक्षांचे प्रतिनिधी आणि मतदार नोंदणी अधिकाऱ्यांची बैठक



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे,दि.19 :** जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समिती सभागृहामध्ये जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या अध्यक्षतेखाली विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी आणि मतदार नोंदणी अधिकारी यांची बैठक संपन्न झाली.

यावेळी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांनी उपस्थितांना सूचित केले की, राजकीय पक्षांनी त्यांच्या बूथ लेवल एजंटची नियुक्ती लवकरात लवकर करावी व त्यांना आवश्यक ते प्रशिक्षण द्यावे. मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी ब्लॉक लेवल ऑफिसर्सची नेमणूक योग्य कालावधीत करावी व त्यांना आवश्यक ते प्रशिक्षण द्यावे. तसेच यादीभाग नकाशे तपासून घ्यावेत. मयत मतदारांची नावे कोणत्याही परिस्थितीत मतदारयादीत असणे अपेक्षित नाही. त्या दृष्टीने आवश्यक ती खबरदारी घेऊन मयत मतदारांची नावे वगळण्याची कार्यवाही तातडीने करावी. तसेच दुबार मतदारांची खात्री करून दुबार नावे नसतील, याची कटाक्षाने दक्षता घ्यावी.

या बैठकीस उप जिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने, 134 भिवंडी ग्रामीण (अ.ज.) विधानसभा मतदारसंघाचे मतदार नोंदणी अधिकारी मल्लिकार्जून माने, 136 भिवंडी (पश्चिम) विधानसभा मतदारसंघाचे मतदार नोंदणी अधिकारी उदय किसवे, 137 भिवंडी (पूर्व) विधानसभा मतदारसंघाचे मतदार नोंदणी अधिकारी अमित सानप, 138 कल्याण (पश्चिम) विधानसभा मतदारसंघाचे मतदार नोंदणी अधिकारी रोहितकुमार राजपूत, 139 मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे मतदार नोंदणी अधिकारी श्रीमती अंजली पवार, 140 अंबरनाथ विधानसभा मतदारसंघाचे मतदार नोंदणी अधिकारी प्रशांत जोशी, 141 उल्हासनगर विधानसभा मतदारसंघातील निवासी नायब तहसिलदार प्रशांत कुमावत, 142 कल्याण पूर्व विधानसभा मतदारसंघातील निवासी नायब तहसिलदार नेहा तांबडे, 143 डोंबिवली विधानसभा मतदारसंघाचे मतदार नोंदणी अधिकारी अमित शेडगे, 144 कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी योगेश जंगले, 145 मीरा-भाईंदर विधानसभा मतदारसंघाचे मतदार नोंदणी अधिकारी सुनील भुताळे, 146 माजिवाडा विधानसभा मतदारसंघाचे मतदार नोंदणी अधिकारी इब्राहिम चौधरी, 147 कोपरी पाचपाखाडी विधानसभा मतदारसंघाचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी मुकेश पाटील, 148 ठाणे विधानसभा मतदारसंघाच्या मतदार नोंदणी अधिकारी उर्मिला पाटील, 149 मुंब्रा कळवा विधानसभा मतदारसंघाचे मतदार नोंदणी अधिकारी विठ्ठल इनामदार, 150 ऐरोली विधानसभा मतदारसंघाच्या मतदार नोंदणी अधिकारी सुचिता भिकाणे, 151 बेलापूर विधानसभा मतदारसंघाच्या मतदार नोंदणी अधिकारी अश्विनी सुर्वे-पाटील, तहसिलदार उज्वला भगत, तहसिलदार प्रदीप कुडाळ, विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी आणि निवडणूक शाखेचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

## कल्याण-डोंबिवलीतील ६५ इमारतींमधील

# नागरिकांना न्याय देणारच !

### आमदार रविंद्र चव्हाण यांची ठाम भूमिका

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** - कल्याण-डोंबिवलीतील 65 इमारतीमधील एकाही रहिवाश्याला बेघर होऊ देणार नाही व सर्व रहिवाश्यांना शासन दरबारी नक्कीच न्याय मिळवून देण्यात येईल अशी ठाम भूमिका भाजपाचे कार्यकारी अध्यक्ष व आमदार रविंद्र चव्हाण यांनी आज घेतली. या महत्त्वाच्या विषयाच्या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली येत्या चार दिवसात चारही विभागांच्या संबंधित अधिका-यांची एकत्रित बैठक आयोजित करण्यात येईल व या प्रश्नावर सकारात्मक तोडगा काढण्यात येईल असे आश्वासन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज मंत्रालयात झालेल्या बैठकीत दिले.

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील 65 इमारतीसंदर्भातील एक महत्त्वाची बैठक बुधवारी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला रविंद्र चव्हाण, आमदार निरंजन डावखरे, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे आदी यांच्यासह विभागाचे अधिकारी उपस्थित होते. तसेच कल्याण डोंबिवली महापालिकेच आयुक्त, ठाणे, रायगड, पालघर व मुंबई शहरचे जिल्हाधिकारी व्हीसी द्वारे उपस्थित होते. यावेळी आपली भूमिका स्पष्ट करताना रविंद्र चव्हाण यांनी सांगितले की, या 65 इमारतीमधील एकही रहिवासी बेघर होऊ देणार नाही. हा विषय गंभीर आहे, त्यामुळे कल्याण डोंबिवली आयुक्त, नगरविकास विभाग, जिल्हाधिकारी व महारेरा या चारही विभागांशी संबधित अधिका-यांशी बैठक घेऊन या विषयासंदर्भात सविस्तर माहिती सादर करावी. या विषयावर तोडगा काढताना एक विशेष प्रकरण म्हणून तोडगा काढण्यात यावा. तसेच या हजारो रहिवाश्यांना न्याय मिळण्याच्यादृष्टीने शासन स्तरावर सकारात्मक मार्ग काढण्याची मागणी रविंद्र चव्हाण यांनी केली.

# राज्याच्या आरोग्य विभागात मोठा घोटाळा

## कागदावरच्या वाहनांसाठी अकरा कोटींची उधळण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

महाराष्ट्रातील 35 जिल्ह्यांमध्ये एकावेळी मोठा घोटाळा झाला आहे. आरोग्य विभागात वाहन घोटाळा झाला आहे. कागदावरच्या वाहनांसाठी 11 कोटी रुपये मोजले. 35 जिल्ह्यांत 1213 वाहनं पुरवठ्यात हा घोटाळा झाला. आरोग्यमंत्र्यांना अंधारात ठेऊन घोटाळा केल्याचा संशय आहे. सरकारी योजनेत ठेकेदाराचा फसवाफसवीचा खेळ पहायला मिळत आहे. 3 महिन्यांचं जवळपास अकरा कोटींचं बील काढण्याचा डाव होता. आरोग्य विभागातील भ्रष्टाचाराचा एका मराठी वृत्तवाहिनीने पर्दाफाश केला आहे. आरोग्य विभागात भाडोत्री वाहन घोटाळा झाल्याची धक्कादायक बाब समोर आलीय. नवं सरकार आणि नव्या आरोग्यमंत्र्यांनी सूत्रं स्वीकारल्याच्या अवघ्या चार दिवसांत या वाहन कंत्राटाची वर्कऑर्डर काढण्यात आली. कंत्राट मिळवणा-या ठेकेदाराची शेकडो वाहनं कागदावर धावतायेत. एवढंच नाही तर कंत्राटदारानं कंत्राटाच्या अटीशर्थीही पाळल्या नसल्याचे समोर येत आहे.



## सुनीता विल्यम्स पृथ्वीवर परतल्या

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

नासाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स व त्यांचे सहकारी बुच विलमोर हे अखेर पृथ्वीवर परतले आहेत. अवघ्या ८ दिवसांच्या अंतराळ मोहिमेसाठी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक अर्थात International Space Station वर गेलेल्या सुनीता विल्यम्स व बुच विलमोर हे तांत्रिक अडचणींमुळे तिथेच अडकले. तब्बल २८६ दिवसांनंतर ते पृथ्वीवर परतले आहेत. पण असं असलं, तरी या काळात संपूर्णपणे वेगळ्या वातावरणात राहिल्यामुळे त्यांच्या शरीराची झालेली झीज भरून काढण्यासाठी त्यांना ४५ दिवसांच्या 'ऍक्लमेटायझेशन प्रोग्राम'मध्ये राहावं लागणार आहे!

# एमपीएससीद्वारे मोठी भरती

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

राज्यातील महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परिक्षांचे अनियमित वेळापत्रक आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातील विद्यार्थी प्रशासकीय सेवेचे स्वप्न उराशी बाळगून स्पर्धा परिक्षांची तयारी करत असतात. मात्र लोकसेवा आयोगाच्या लालफिती कारभारामुळे हजारो विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. त्यामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला सक्षम बनवावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे आमदार शिवाजीराव गर्जे यांनी लक्षवेधीद्वारे विधानपरिषेदत केली होती. यावर उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यूपीएससीच्या धर्तीवर एमपीएससीच्या परीक्षांचे कॅलेंडर तयार केले जाणार असल्याचे म्हटले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, यूपीएससीमध्ये कधी परीक्षा होणार, कधी मुख्य परीक्षा आणि मुलाखत होणार, याचे कॅलेंडर निश्चित असते. पण दुर्दैवाने आपल्याकडे कॅलेंडर तयार केल्यानंतरही त्याची अंमलबजावणी झालेली नाही. २०१८-१९ पासून राज्यात आरक्षणाचे वेगवेगळे निर्णय झालेले आहेत. ईडब्लूएस, एसईबीसीचा विषय पुढे येतो. वेगवेगळ्या न्यायालयाने दिलेल्या स्थगितीमुळे कधी कधी भरतीमध्ये अधिक वेळ लागतो. पण पुढच्या काळात यूपीएससीप्रमाणे एमपीएससीने कॅलेंडर तयार करण्यावर भर दिला जाईल.

एमपीएससीच्या वर्णनात्मक परीक्षा पद्धतीबाबतही यावेळी प्रश्न विचारण्यात आला. त्याला उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले की, २०२३ साली आपण वर्णनात्मक परीक्षा पद्धत आणली होती. पण त्यावेळी विद्यार्थ्यांनी विनंती केल्यामुळे २०२५ पर्यंत जुनीच पद्धत लागू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. पण २०२५ पासून वर्णनात्मक पद्धतीने परीक्षा होतील.

तसेच बहुसंख्य विद्यार्थ्यांचा वर्णनात्मक पद्धतीला पाठिंबा असून काही मोजके विद्यार्थी विरोध करत आहेत. पण हा निर्णय घेणे गरजेचे आहे. कारण आपल्या विद्यार्थ्यांना यूपीएससीमध्ये नुकसान होते. एमपीएससी वर्णनात्मक पद्धतीत असेल तर राज्यातील विद्यार्थ्यांना यूपीएससीतही फायदा होईल, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

एमपीएससीच्या परीक्षा खासगी संस्थांकडून न घेता आयोगाकडूनच घेण्यात याव्यात, अशीही मागणी करण्यात आली होती. यावर उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, प्रश्नपत्रिका तयार करणे, परीक्षा घेणे ही सर्व कामे एमपीएससीकडूनच होतात. केवळ काही इन्फ्रास्ट्रक्चर बाहेरून घेतले जाते. बाकी सर्व कामे आयोगाकडूनच होतात. एमपीएससीने गेल्या काही वर्षात पारदर्शक पद्धतीने परीक्षा घेण्याचा उपक्रम चालवला असून त्यात कोणताही गोंधळ झालेला नाही.

तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगात रिक्त असलेल्या तीन जागा भरण्यासाठी तात्काळ कार्यवाही करण्यात येत आहे, असेही फडणवीस यांनी सांगितले. एमपीएससीद्वारे पुढील काळात मोठ्या प्रमाणात भरती राबवली जाणार आहे. ती वेळेत व्हावी, यासाठी सामान्य प्रशासन खात्यामधील सेवा विभागाच्या सचिवांना इतर राज्यांच्या लोकसेवा आयोगाचा अभ्यास केला आहे. त्या अभ्यासानुसार लोकसेवा आयोगाला नवे स्वरुप दिले जाईल. वर्ग १ आणि वर्ग २ बरोबर आता वर्ग ३ ही आपण एमपीएससीला दिले आहे. सर्व परीक्षा वेळेत घेण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.

# डोंबिवलीत लवकरच रो-रो सेवा

### ठाणे, नवी मुंबई, वसई, विरार जलमार्गाने जोडले जाणार



#### जेट्टीच्या बांधकामास सुरुवात...

**२०१८ साली तत्कालीन पालकमंत्री एकनाथ शिंदे आणि कल्याणचे खासदार श्रीकांत शिंदे यांच्यासह या जलवाहतूक मार्गाची पाहणी करण्यात आली होती. त्यानंतर ठाणे महापालिकेने पुढाकार घेऊन जलवाहतूक मार्गाचा डीपीआर तयार करण्यात आला होता. केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांनी बैठक घेतली होती. नितीन गडकरी यांनी या जलवाहतूक मार्गासाठी १ हजार कोटीचा निधीही मंजूर केला. कोवीड काळामुळे जलवाहतूक मार्गाचे काम होऊ शकले नाही. पण आता डोंबिवली मोठा गाव गणेश घाटावर जेट्टी बांधण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवलीकरांसाठी आनंदाची बातमी आहे. डोंबीवलीतून आता थेट ठाणे, नवी मुंबई आणि वसई-विरार याठिकाणी जलमार्गाने प्रवास करता येणार आहे. डोंबिवलीवरून याठिकाणी प्रवास करण्यासाठी लवकरच रो-रो सेवा सुरू होणार आहे. डोंबिवली पश्चिमेतील मोठागाव खाडी परिसरातील गणेश घाटावर आज जेट्टीच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले.

ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे यांनी सांगितले की, जेट्टीच्या कामासाठी २२ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या कामाचे भूमिपूजन आज करण्यात आले. लवकरच या मार्गाने जलवाहतूक सुरू होईल. रोरो बोटने वाहनांसह ठाणे, नवी मुंबई आणि वसई-विरार गाठणे शक्य होणार आहे . यावेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले .

#### मुख्यमंत्र्यांचे आभार

विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या १०० दिवसांच्या कारर्किदीत या जलवाहतूक मार्गाचा समावेश केला आहे. त्यामुळे या मार्गासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार श्रीकांत शिंदे यांनी विशेष प्रयत्न केले असल्याचे सांगत दीपेश म्हात्रे यांनी त्यांचे आभार मानले . डोंबिवलीत जेटीसाठी २२ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. डोंबिवलीवरून कुठपर्यंत जाता येणार? जेट्टीच्या कामाला सुरुवात होऊन लवकर हा जलवाहतूकीचा मार्ग सुरु होईल.

# नागपूर हिंसाचाराचा मास्टरमांइड फहीम खान गजाआड !

## कोर्टाने २१ मार्चपर्यंत सुनावली पोलिस कोठडी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

गेल्या काही दिवसांपासून छत्रपती संभाजीनगरमधील खुलताबाद येथे असलेल्या औरंगजेबाची कबर हटवण्यावरुन राजकारण तापले आहे. महाराष्ट्रातून औरंगजेबाची कबर हटवा अन्यथा बाबरीची पुनरावृत्ती होईल, असा इशारा विश्व हिंदू परिषदेसह बजरंग दलाकडून देण्यात आला आहे. त्यातच नागपुरात दोन दिवसांपूर्वी मोठा हिंसाचार उफाळला. नागपुरात दोन गटांमध्ये झालेल्या राड्यानंतर जाळपोळ, तोडफोड करण्यात आली. आता नागपुरातील या संपूर्ण हिंसाचारामागे नेमकं कोण आहे, याचा नाव पहिल्यांदाच समोर आले आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नागपूरमध्ये झालेल्या हिंसाचाराचा मास्टरमाईंडचे नाव पहिल्यांदा समोर आले आहे. नागपुरात झालेल्या हिंसाचारामागे फहीम खान असल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. फहीम खान याने लोकांना भडकवण्याचे काम केले. त्यानंतर ही हिंसा घडली. नागपूरमधील गणेशपेठ पोलिस ठाण्यात नोंदवलेल्या दुसऱ्या तक्रारीमध्ये उघड झाले आहे. फहीम खान हा मायनॉरिटी डेमोक्रॅटिक पार्टी (एमडीपी) शहराध्यक्ष आहे. या तक्रारीनुसार जमावाने अंधाराचा फायदा घेत महिला पोलिस कर्मचाऱ्यांचा विनयभंग करण्याचा प्रयत्न केला. विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी गांधी गेटजवळील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर निदर्शने केली. औरंगजेबाच्या थडग्याविरुद्ध घोषणाबाजी करण्यात आली. तसेच औरंगजेबाचा प्रतिकात्मक पुतळा जाळण्यात आला. याचा निषेध करण्यासाठी, मायनॉरिटी डेमोक्रॅटिक पार्टी (एमडीपी) शहराध्यक्ष फहीम खान यांच्या नेतृत्वाखाली पोलिस स्टेशनवर मोर्चा काढला. तसेच परिसरात दहशत निर्माण करण्यासाठी, लोकांमध्ये भीती निर्माण करण्यासाठी आणि धार्मिक शत्रुत्व निर्माण करण्याच्या उद्देशाने सामाजिक सलोखा बिघडवण्याच्या उद्देशाने जमावाने कुऱ्हाडी, दगड, काठ्या आणि इतर धोकादायक शस्त्रांचा वापर केला. नागपूर हिंसाचार प्रकरणी आतापर्यंत ४६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांना २१ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. यातील काही आरोपींनी चिटणीस पार्क ते सीए रोडकडे जाणाऱ्या रस्त्यावर महिला पोलिसासोबत हा प्रकार केला. हिंसाचारातील आरोपींनी एका महिला पोलीस कर्मचाऱ्याला स्पर्श करुन वर्दी खेचण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर काही महिला पोलिसांना जमावातील काही लोकांनी शिवीगाळ देखील केल्याची माहिती समोर येत आहे.

#### महिला पोलीस कर्मचाऱ्याचा विनयभंगाचा प्रयत्न

**औरंगजेबाची कबर हटवण्याच्या मुद्द्यावरुन नागपुरात सोमवारी रात्री हिंसाचार झाला. या हिंसाचारादरम्यान, समाजकंटकांकडून पोलिसांना मोठ्या प्रमाणात लक्ष्य करण्यात आलं. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कठोर कारवाईचा इशारा दिला आहे. दुसरीकडे, या हिंसाचारादरम्यान कर्तव्य बजावणाऱ्या महिला पोलीस कर्मचाऱ्याचा विनयभंग करण्याचा प्रयत्न झाल्याची माहितीही समोर आली आहे. अंधाराचा फायदा घेत काही आरोपींनी इतर महिला पोलिसांनाही शिवीगाळ करत अश्लील शेरेबाजी केली.**



# गीतासार



### अध्याय ५ कर्मसंन्यासयोगः

युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शान्तिमाप्नोति नैष्ठिकीम् । अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबध्यते ॥ ५-१२ ॥

कर्मयोगी कर्मांच्या फळांचा त्याग करून भगवत्प्राप्तीरूप शांतीला प्राप्त होतो आणि कामना असलेला पुरुष कामनांच्या प्रेरणेमुळे फळांत आसक्त होऊन बद्ध होतो. ॥ ५-१२ ॥

सर्वकर्माणि मनसा संन्यस्यास्ते सुखं वशी । नवद्वारे पुरे देही नैव कुर्वन्न कारयन् ॥ ५-१३ ॥

अंतःकरण ज्याच्या ताब्यात आहे, असा सांख्ययोगाचे आचरण करणारा पुरुष कोणतेही कर्म करणारा किंवा करविणारा न होताच नऊ दरवाजांच्या शरीररूपी घरात सर्व कर्मांचा मनाने त्याग करून आनंदाने सच्चिदानंदघन परमात्म्याच्या स्वरूपात स्थित राहातो. ॥ ५-१३ ॥

न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः । न कर्मफलसंयोगं स्वभावस्तु प्रवर्तते ॥ ५-१४ ॥

परमेश्वर मनुष्यांचे कर्तेपण, कर्मे आणि कर्मफलांशी संयोग उत्पन्न करीत नाही; तर प्रकृतीच खेळ करीत असते. ॥ ५-१४ ॥

## आरोग्य

# लोह खनिज

लोहाच्या कमतरतेमुळे अशक्तपणा होऊ शकतो, ही अशी स्थिती आहे ज्यामध्ये शरीरात पुरेशा लाल रक्तपेशी नसतात. अशक्तपणाची लक्षणे म्हणजे थकवा, अशक्तपणा, श्वास घेण्यास त्रास होणे, डोकेदुखी आणि चक्कर येणे. लोहाच्या कमतरतेमुळे नैराश्य आणि चिंता यासारख्या मानसिक आरोग्य समस्या देखील उद्भवू शकतात.

**लोहाच्या कमतरतेची लक्षणे**

१. थकवा आणि अशक्तपणा: लोहाच्या कमतरतेमुळे लाल रक्तपेशींची संख्या कमी होते, ज्यामुळे शरीरातील ऊतींपर्यंत पुरेसा ऑक्सिजन पोहोचू शकत नाही. यामुळे थकवा आणि अशक्तपणा जाणवू शकतो.

२. श्वास घेण्यास त्रास: लोहाच्या कमतरतेमुळे शरीराला पुरेसा ऑक्सिजन मिळत नाही, ज्यामुळे श्वास घेण्यास त्रास होऊ शकतो, विशेषतः व्यायाम करताना.

३. डोकेदुखी: लोहाच्या कमतरतेमुळे डोकेदुखी होऊ शकते. कारण लोहाच्या कमतरतेमुळे मेंदूपर्यंत पुरेसा ऑक्सिजन पोहोचू शकत नाही.

४. चक्कर येणे: लोहाच्या कमतरतेमुळे देखील चक्कर येऊ शकते. कारण लोहाच्या कमतरतेमुळे रक्तदाब कमी होऊ शकतो.

५. त्वचा, नखे आणि केसांमध्ये बदल: लोहाच्या कमतरतेमुळे त्वचा, नखे आणि केसांमध्ये बदल होऊ शकतात. त्वचा फिकट गुलाबी, कोरडी किंवा खवलेयुक्त होऊ शकते. नखे पातळ आणि ठिसूळ होऊ शकतात. केस पातळ होऊ शकतात किंवा गळू शकतात.

**लोहाच्या कमतरतेचा मानसिक आरोग्यावर कसा परिणाम होतो?**

लोहाच्या कमतरतेमुळे नैराश्य आणि चिंता यासारख्या मानसिक आरोग्य समस्या उद्भवू शकतात. कारण मेंदूच्या आरोग्यासाठी लोह आवश्यक आहे. लोह सेरोटोनिन आणि डोपामाइन सारख्या न्यूरोट्रांसमीटरच्या निर्मितीस मदत करते, जे मूड नियंत्रित करतात. लोहाच्या कमतरतेमुळे या न्यूरोट्रांसमीटरचे उत्पादन कमी होऊ शकते, ज्यामुळे नैराश्य आणि चिंता निर्माण होऊ शकते.

**लोहाची कमतरता कशी टाळायची?**

लोहाची कमतरता टाळण्यासाठी, लोहयुक्त पदार्थ खावेत. लोहयुक्त पदार्थांमध्ये हे समाविष्ट आहे. बीन्स, मसूर, हिरव्या पालेभाज्या, सुकामेवा, संपूर्ण धान्य. लोहाचे शोषण वाढवण्यासाठी, लोहयुक्त पदार्थ खा, ज्यामध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते, जसे की संत्र्याचा रस किंवा ब्रोकोली.

# आता राज्यात फायनान्शियल इंटेलिजन्स युनिट

## - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई, : नियमानुसार देण्यात येणाऱ्या व्याजापेक्षा दुपटीने व्याज देणाऱ्या योजनांच्या जाहिराती, भरमसाठ व्याजाच्या योजनांचे आमिष दाखवून पतसंस्थांमधील अथवा बँकांमधील ठेवीदारांची होणारी फसवणूक टाळण्यासाठी राज्यात आता 'फायनान्शिअल इंटेलिजन्स युनिट' ची स्थापना करण्यात येईल. या युनिटच्या माध्यमातून अशा योजना जाहिरातींची माहिती घेऊन ठेवीदारांची फसवणूक टाळण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या शाखेतील गैरव्यवहाराबाबत सदस्य प्रकाश सोळंके यांनी प्रश्न उपस्थित केला होता.या प्रश्नाच्या उत्तरात अधिक माहिती देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यात काही मल्टिस्टेट पतसंस्था ठेवीदारांची फसवणूक करत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. त्यामुळे अशा पतसंस्था, बँका, चिटफंड कंपन्या यांना नियमांच्या चौकटीत आणून ठेवीदारांचे पैसे सुरक्षित करण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील आहे. सहकारी बँकांमधील लहान गुंतवणूकदारांच्या पाच लाखांपर्यंतच्या ठेवी सुरक्षित रहाव्यात, यासाठी केंद्र शासनाच्या सहकारी बँकांविषयीच्या कायद्याप्रमाणे पतसंस्थांमधील ठेवीदारांच्या ठेवींचे संरक्षण करण्यासाठी केंद्र शासनाकडे कायद्यात बदल करणे किंवा नवीन कायदा करण्याची मागणी केंद्र सरकारकडे करण्यात येईल.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, बीड जिल्हयातील ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सो. लिमीटेड या बँकेच्या राज्यभरातील ५० शाखांमधील फसवणूक झालेल्या गुंतवणूकदारांची संख्या २० हजार ८०२ असून त्यांची ११२१.४७ कोटी इतक्या रकमेची फसवणूक झाली आहे. या बँकेच्या चेअरमन व संचालक यांच्याकडून ठेवीदारांना ठेवी परत करण्यासाठी वारंवार तारखा देण्यात आल्या. परंतु ठरलेल्या तारखेला ठेवीदारांना ठेवी परत करण्यास टाळाटाळ करण्यात आली. या पतसंस्थेकडून फसवणूक झालेल्या ठेवीदारांचे पैसे जप्त करण्यात आलेल्या मालमत्तांचा लिलाव करून परत केले जातील, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी बाबत ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासाठी महाराष्ट्र ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण कायद्यानुसार 80 मालमत्ता निश्चित करण्यात आल्या आहेत. या 80 मालमत्ता जप्त करून कायद्यानुसार त्याचा लिलाव करण्यात येईल. या मालमत्तांची किंमत 6 हजार कोटी रुपये आहे. मालमत्ता लिलावाची कार्यवाही अधिक गतीने पूर्ण करून ठेवीदारांचे पैसे परत करण्यात येतील.

या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य नाना पटोले, बबनराव लोणीकर, राहुल पाटील यांनीही उपप्रश्न उपस्थित केले.

# नाशिकमध्ये रंगपंचमीची आगळीवेगळी परंपरा





नाशिकमध्ये रंगपंचमीची आगळीवेगळी परंपरा आहे. नाशिककर पेशवेकालीन रहाडीत धप्पा मारत रंगपंचमी साजरी करतात. या रहाडींचा इतिहासदेखील अत्यंत रंजक आहे. पूर्वी गल्लीतील तालमीच्या पेहलवान मंडळींच्या गटा तटाची शक्ती प्रदर्शनची जागा म्हणजे रहाड मानली जायची. येथे कधी काळी कुस्तीचे सामने सुद्धा आयोजन केले जायचे.कुस्तीच्या ह्या आयोजन मुळे येथे हाणामाऱ्या होत असे त्यामुळे राहाडा हा शद्वप्रयोग प्रचलित झाला असावा आणि त्याच्या वरून रहाड हा शब्द नाशिक लोकांच्या मनावर कोरला गेला आहे.नाशिक मधील लोकांची राहाड वर धप्पा मारल्या शिवाय रंगपंचमी पूर्ण होत नाही. 25 बाय 25 फुटांचा चौरस आणि साधारणपणे 10 ते 12 फुटांची खोली असलेल्या हौदात नैसर्गिक फुलांपासून तयार केलेले रंग टाकले जातात आणि रंगपंचमीच्या दिवशी दुपारी 2 वाजेनंतर या रहाडीची पारंपरिक पूजा करून; नाशिककर नागरिक या रहाडीत उडी मारून रंगोत्सव साजरा करतात. राहाडीत नैसर्गिक फुलांपासून तयार केलेले रंग टाकले जातात. ज्यामुळे त्वचा रोग होत नाही. तसेच उन्हाळयात ऊन बाधत नाही, अशीही आख्यायिका आहे. त्यामुळे आबालवृद्धांपासून युवकांची इथं रंग खेळण्यासाठी प्रचंड गर्दी होत असते. यात शनिचौक, पंचवटी येथे गुलाबी रंगाची रंगपंचमी खेळली जाते. गाडगे महाराज पुलाजवळ पिवळा रंगाने रंगपंचमी खेळली जाते. रोकडोबा तालीम संघ, मधली होळी तालमी जवळ केशरी-नारंगी रंगाने होळी खेळली जाते, असे याचे वैशिष्ट आहे. रंग विविध प्रकारच्या वनस्पतीच्या फुलांपासूनतयार केला जातो. त्या फुलांना सुमारे दोन तास एका मोठ्या भांड्यात टाकून उकळविले जाते. या रंगात हजारो मंडळी यात उड्या मारून आनंद साजरा करतात. संपूर्ण नाशिक शहरात आधी 17 राहाडी अस्तित्वात होत्या, आता त्या ५ ते ६ आहेत.

# चंद्रभागा नदीच्या प्रदूषण मुक्तीसाठी 'नमामि चंद्रभागा' अभियान

## - मंत्री पंकजा मुंडे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : पंढरपूर हे दक्षिण भारताची काशी म्हणून ओळखले जाते. त्यामुळे या पवित्र ठिकाणी असलेली चंद्रभागा नदी प्रदूषणमुक्त असायला पाहिजे. केंद्र शासनाच्या 'नमामि गंगा' या नदी शुद्धीकरण प्रकल्पाच्या धर्तीवर राज्यात चंद्रभागा नदीच्या प्रदूषण मुक्तीसाठी 'नमामि चंद्रभागा' अभियान राबविण्यात येत आहे, असे पर्यावरण वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

चंद्रभागा नदीच्या प्रदूषणाबाबत सदस्य अभिजीत पाटील यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य समाधान आवताडे, राजू खरे यांनीही सहभाग घेतला.

या प्रश्नाच्या उत्तरात अधिक माहिती देताना पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, 'नमामी चंद्रभागा' अभियानांतर्गत 48.25 कोटी किमतीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या आहेत. राज्य शासनाने 34.65 कोटी इतका निधी वितरित केला आहे. या योजनेअंतर्गत सांडपाणी व्यवस्थापन व अनुषंगिक कामे प्रगतीपथावर आहेत. चंद्रभागेच्या प्रदूषणाबाबत तक्रार आल्यास तात्काळ कारवाई करण्यात येईल. पंढरपूर शहर तसेच आजूबाजूच्या परिसरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

पंढरपूर शहरातून वाहणाऱ्या चंद्रभागेच्या प्रदूषणाबाबत पंढरपूर शहराचा दौरा करून परिस्थितीची पाहणी करण्यात येईल. याबाबत आढावा घेण्यात येईल. पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, जलसंपदा विभाग या संबंधित विभागांनाही यावेळी आमंत्रित केले जाईल, असेही पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.

# राज्यातील बसस्थानक अत्याधुनिक सेवासुविधायुक्त करणार

## - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

मुंबई : राज्यातील बसस्थानक अत्याधुनिक सेवासुविधायुक्त करण्यासाठी " बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा " या तत्वावर विकसित करण्यावर भर देण्यात येत आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग सावंतवाडी व अंबोली, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड बसस्थानकाला प्रवाशांसाठी रस्ता उपलब्ध करून देण्यात यावा तसेच जळगाव जिल्ह्यातील चोपडा बसस्थानक अत्याधुनिक बसपोर्ट उभारण्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी अशा सूचना परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिल्या.

विधानभवन येथे राज्य परिवहन विभागाच्या विविध विषयाच्या अनुषंगाने बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत परिवहन मंत्री श्री. सरनाईक बोलत होते. यावेळी माजी मंत्री अब्दुल सत्तार, माजी मंत्री दीपक केसरकर, आमदार चंद्रकांत सोनावणे, एसटी महामंडळाचे बांधकाम महाव्यवस्थापक दिनेश महाजन, मुख्य लेखाधिकारी तथा आर्थिक सल्लागार गिरीश देशमुख यावेळी उपस्थित होते.

मंत्री श्री. सरनाईक म्हणाले की, शहर, तालुका व ग्रामीण भागातील परिवहन व्यवस्था बळकटीकरणासाठी " बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा " या तत्वावर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी, दोडामार्ग व अंबोली ही बसस्थानक विकसित करण्यात येतील. यावेळी माजी मंत्री दीपक केसरकर यांनी अंबोली येथील बसस्थानक पर्यटन दृष्ट्या महत्त्वाचे असून तेथे सर्व सुविधायुक्त नवीन बसस्थानक बांधण्यात यावे अशा सूचना केली. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड बसस्थानक येथे वारंवार होत असलेले अपघात लक्षात घेता या बसस्थानक परिसरात रस्ता उपलब्ध करून देण्यात यावा अशी येथील स्थानिकांची मागणी विचारात घेतली जावी अशी सूचना माजी मंत्री अब्दुल सत्तार यांनी केली. परिवहन मंत्री सरनाईक यांनी याबाबत लवकरच निर्णय घेऊन बसस्थानकात पर्यायी रस्ता उपलब्ध करून देण्यात येईल असे आश्वासन दिले.

जळगाव जिल्ह्यातील चोपडा बसस्थानकाचे अत्याधुनिकीकरण करण्यात यावे याबाबतीत स्थानिक आमदार चंद्रकांत सोनावणे यांनी सूचना केल्या. मध्यप्रदेश राज्याच्या सीमावर्ती भागामध्ये असलेला आदिवासीबहुल तालुका म्हणून चोपडा तालुका ओळखला जातो. या तालुक्यातील महत्त्वाचे बसस्थानक म्हणून चोपडा बसस्थानक अत्याधुनिक सोयी युक्त बनविण्यात यावे अशी मागणी केली. याबाबतीत लवकरच निविदा प्रक्रिया राबवून बांधा वापरा व हस्तांतरित करा या तत्त्वावर चोपडा बसस्थानक विकसित करण्याच्या सूचना मंत्री श्री. सरनाईक यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

# पिरकोन येथे रोजगार मेळाव्याचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : लायन्स क्लब ऑफ पनवेल, द्रोणागिरी व उरण आणि यशस्वी अकॅडमी फॉर स्किल्स, पनवेल व अविनाश म्हात्रे (पाले) व मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने २३ मार्च २०२५ रोजी सकाळी १० ते ३.३० वाजता या वेळेत रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पिरकोन, ता. उरण. (कृ.द. जोशी सभागृह) येथे भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. उमेदवारांनी आपली नावनोंदणी करण्यासाठी खाली दिलेल्या लिंकला क्लीक करून किंवा गूगलवर सर्च केल्यानंतर येणाऱ्या नावनोंदणी अर्जाला पूर्णपणे भरून स्वतःची नाव नोंदणी करावी. https://bit.ly/pirkonjobfair_registration या लिंक द्वारे नाव नोंदणी करावी. या मेळाव्यात विविध नामांकित कंपन्या व नियोक्त्यांकडून रिक्त पदे भरण्यात येणार आहेत. या रिक्त पदांसाठी पात्रतेप्रमाणे उमेदवारांच्या नोंदणी व प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात येणार आहेत. या सुवर्ण संधीचा लाभ घेण्यासाठी रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पिरकोन, ता. उरण. (कृ.द. जोशी सभागृह) या पत्त्यावर उपस्थित रहावे असे आवाहन लायन्स क्लब ऑफ पनवेल, द्रोणागिरी व उरण आणि यशस्वी अकॅडमी फॉर स्किल्स, पनवेल व अविनाश म्हात्रे व मित्र परिवार (पाले) यांच्यावतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी खाली दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधावा.लायन्स क्लब ऑफ पनवेल व यशस्वी ग्रुप ला. एस. जी चव्हाण अध्यक्ष 9372413342, ला. प्रमोद गजहंस - 9372603865, बाळकृष्ण म्हात्रे -9324725532, समाधान जावळे -9324725524, लायन्स क्लब ऑफ द्रोणागिरीचे संदीप म्हात्रे -9821142202, अविनाश म्हात्रे (पाले) व मित्र परिवारचे प्रमुख - अविनाश म्हात्रे 9004709244 यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# कल्याण पूर्वेत शिवजयंती सोहळा उत्साहात संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : छत्रपती शिवाजी महाराज यांची तिथी नुसार जयंती मोठ्या उत्साहात कल्याणमध्ये साजरी करण्यात आली. कल्याण पूर्वेत शिव जयंती निमित्त शिवसेनेच्या वतीने शिव प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. कल्याण पूर्व शिवसेना शहर शाखेच्या माध्यमातून शहर प्रमुख नीलेश शिंदे यांच्या वतीने काढण्यात आलेल्या भव्य मिरवणूकीचा प्रारंभ सायंकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक 'ड' प्रभाग कार्यालय येथून झाला.

ही मिरवणूक पुढे पुणे लिंक रोड ने काटेमानिवली चौक, कल्याण स्टेशन रोड, कोळसेवाडी मार्गे गणपती मंदिर सिद्धार्थ नगर, म्हसोबा चौक, तिसगांव रोड मार्गे तिसगांव नाक्यावरून तिसगांव प्रवेश द्वार मार्गे जरीमरी मंदिर तिसगांव येथे या मिरवणूकीची सांगता करण्यात आली. या मिरवणुकीत मोठ्या रथामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा ठेवून या रथापुढे ढोल ताशा पथक, लेझिम पथक, तारपा नृत्य पथक, दांडपट्टा, तलवारवार बाजी, आदी प्रकारची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. या मिरवणुकीत माजी लोकप्रतिनिधी, शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते, सर्वसामान्य नागरिक, शाळकरी विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.









# प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेत कुटुंबातील एकाच महिलेला शिलाई मशीनचा लाभ दिला जाईल

## - उद्योगमंत्री उदय सामंत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेच्या माध्यमातून महिलांना शिलाई मशीन व घरघंटी वाटप करण्यासाठी ठाणे येथील जिल्हा खनिज प्रतिष्ठान यांच्या प्रशासकीय मान्यतेनंतर निधी वितरीत करण्यात आला आहे. याबाबत काही तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. याचा तपास करून एका कुटुंबात एकाच महिलेला शिलाई मशीनचा लाभ दिला जाईल, असे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी विधान सभेत सांगितले.

यासंदर्भात विधानसभा सदस्य किसन कथोरे यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती.उद्योगमंत्री श्री. सामंत म्हणाले की, या योजनेचा लाभ घेण्यासाठी स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देऊन प्रसिध्दी दिली गेली. नगरपरिषदेच्या सूचना फलकावरही जाहीर सूचना लावण्यात आली. विहित अटी व शर्तीनुसार प्रारूप अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांसह इच्छुक महिलांकडून अर्ज मागवण्यात आले. अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांची योजनेच्या अटी व शर्तीनुसार छाननी करण्यात आली. छाननी अंती पात्र व अपात्र महिलांच्या नावांची यादी तयार करण्यात आली. तसेच या सोडत प्रक्रियेमध्ये लाभार्थ्यांच्या नावाची गोपनीयता राखण्यासाठी केवळ अर्ज क्रमांकांचे एकत्रीकरण करून संगणकीय सोडत घेण्यात आली. प्रक्रियेचे व्हिडिओ शूटिंगही करण्यात आले आहे, तसेच योजनेच्या मार्गदर्शक सूचना व निकषांनुसार लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. पारदर्शक पद्धतीने ही प्रक्रिया राबविण्यात आली आहे. मात्र लोकप्रतिनिधींनी केलेल्या तक्रारीचा विचार करून याचा तपास केला जाईल, असेही श्री. सामंत यांनी विधानसभेत सांगितले.

## आत्मा योजनेअंतर्गत जिल्हाअंतर्गत

# शेतकरी प्रशिक्षणाचे आयोजन



शहापूर ग्रामिण : कल्याण तालुक्यातील नवगाव येथे आत्मा योजनेअंतर्गत शेतकरी प्रशिक्षणाचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. सदर प्रशिक्षणासाठी डॉ.मयुरी गोळे कृषी विज्ञान केंद्र नागाव यांनी पशुसंवर्धन व कुक्कुटपालन याविषयी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले व त्यांच्या शंकांचे निरसन केले. भगवान पथारे साहेब, मंडळ कृषी अधिकारी कल्याण यांनी राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन योजनेविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. प्रवीण बिऱ्हाडे,कृषी पर्यवेक्षक मामनोली यांनी फार्मर आयडी व कृषी विभागाच्या इतर योजना विषयी मार्गदर्शन केले. वैशाली भापसे तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना करून आत्मा योजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या बाबींची माहिती दिली. शुभांगी नेवरेकर कृषी सहाय्यक, बापसई यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले कार्यक्रमासाठी सुरेश टेंभे, पोलीस पाटील नवगाव तसेच दिलीप टेंभे, शंकर टेंभे,पांडुरंग टेंभे, अविनाश टेंभे* प्रगतशील शेतकरी,कृषी सखी व इतर शेतकरी उपस्थित होते. सदर प्रशिक्षणाचे नियोजन रामेश्वर पाचे , प्रकल्प संचालक आत्मा तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी ठाणे व कुमार जाधव तालुका कृषी अधिकारी कल्याण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.


जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११२४) कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# झोपडीधारकांना मोफत घरे अयोग्य
## सरकारच्या धोरणावर उच्च न्यायालय नाराज

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी

**मुंबई :** झोपडपट्टी पुनर्वसन (झोपु) योजनेंतर्गत झोपडीधारकांना मोफत घरे देण्याच्या सरकारच्या धोरणाबाबत उच्च न्यायालयाने मंगळवारी पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित केला. तसेच, झोपडीधारकांचे पुनर्वसन करताना त्यांना मोफत घरे उपलब्ध करण्याऐवजी त्यांच्याकडून विशिष्ट रक्कम आकारण्याची गरज न्यायालयाने बोलून दाखवली.

त्याचप्रमाणे, मुंबईतील २०११ पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण देण्यात आले असून त्यानंतर सरकारने ही मुदत वाढवलेली नसल्याबाबत न्यायालयाने समाधान व्यक्त केले. तसेच, सरकार ही भूमिका पुढेही



कायम ठेवेल, अशी आशा न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाने व्यक्त केली. तथापि, हे धोरण केवळ मुंबईपुरते मर्यादित आहे की राज्यातील अन्य शहरांनाही लागू आहे, अशी विचारणा न्यायालयाने सरकारकडे केली व त्याबाबत भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले.

सर्वोच्च न्यायालयाने ३० जुलै रोजी महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, मंजुरी आणि पुनर्विकास) कायद्याच्या अंमलबजावणीतील त्रुटींबाबत चिंता व्यक्त केली होती. तसेच, कायद्याच्या पुनरावलोकनाचे आदेश उच्च न्यायालयाला दिले होते. त्यानुसार, उच्च न्यायालयाने स्वतःहून या प्रकरणी जनहित याचिका दाखल केली असून न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठापुढे त्यावर सध्या विशेष सुनावणी सुरू आहे.

या प्रकरणी मंगळवारी झालेल्या सुनावणीच्या वेळी मुंबईतील झोपडपट्ट्यांची संख्या, झोपु योजनेंतर्गत त्यांना दिली जाणारी मोफत घरे, पायाभूत सुविधांवर येणारा ताण याबाबतही न्यायालयाने प्रश्न उपस्थित करून मुंबईत झोपड्याच राहणार नाहीत अशी योजना अंमलात आणण्याबाबत विचार होणे गरजेचे असल्यावर न्यायालयाने यावेळी भर दिला. मुंबईत झोपडपट्ट्या ही एक गंभीर समस्या बनली आहे.

# नागरिकांच्या विरोधामुळे
## वसई विरार पालिकेच्या करवाढीला स्थगिती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई:** २०२५ – २६ च्या अर्थसंकल्पात पालिकेने उत्पन्न वाढीसाठी पाणीपट्टी करात २५ टक्के तर मालमत्ता करात ५ ते ७ टक्के वाढ करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र करवाढीला नागरिकांनी केलेल्या विरोधानंतर पालिकेने माघार घेत करवाढीला स्थगिती दिली आहे. आता महापालिका अधिकारी आणि सर्वपक्षीय समिती नियुक्त करून त्याबाबत निर्णय घेतला जाणार असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे.

वसई विरार शहर महापालिकेने सन २०२४-२५ चा सुधारीत अर्थसंकल्प ३५३८.९४ कोटी व सन २०२५-२६ चा मूळ अंदाज असलेला ३ हजार ९२६ कोटी ४४ लाखांचा अर्थसंकल्प नुकताच पालिकेने सादर केला आहे. पाणी पुरवठा लाभ कर आणि मलप्रवाह सुविधा लाभ कर हे दोन्ही कर महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ च्या कलम १३० व १३१ नुसार लावणे शासनाने बंधनकारक करण्यात आले आहे. त्यानुसार यंदाच्या अर्थसंकल्पात मालमत्ता करात ५ ते ७ टक्के, तर पाणीपट्टी करात २५ टक्क्यांनी वाढ करण्याचा निर्णय घेतला होता.. १ एप्रिल पासून ही करवाढ लागू होणार असल्याचे पालिकेने जाहीर केले होते.

मात्र करवाढीच्या निर्णयाला शहरातील नागरिक, लोकप्रतिनिधी, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी यांनी विरोध दर्शवत करण्यात आलेली करवाढ रद्द करण्यात यावी अशी मागणी केली होती. तर दुसरीकडे पालिकेने करवाढ करताना येथील नागरिक व विविध राजकीय पक्षाच्या पदाधिकारी यांना विश्वासात न घेताच केली असल्याचा आरोप करण्यात आला होता. करवाढी बाबत जनक्षोभ उसळू लागला होता. तर काही राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी आंदोलन छेडण्याचा इशारा ही पालिकेला दिला होता. या विरोधानंतर पालिकेने माघार घेत तात्पुरता स्वरूपात करवाढीला स्थगिती दिली आहे.

# अविघटनशील प्लॅस्टिक साठवणुक भिवंडी मनपाची कारवाई



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी/ दि.19 :** भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मौजे चाचिद्रा गांव या ठिकाणी मोह. उस्मान मेहमूद यांच्या गाळ्यावर अविघटनशील एकल वापर प्लॅस्टिक हे 120 मायक्रॉन पेक्षा कमी अविघटनशील एकल वापर प्लॅस्टिक करणेचा गाळ्यावर महानगरपालिकेचे अधिकारी / प्लॅस्टिक पथक कर्मचारी आणि महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ ठाणे, व सायन या कार्यालयातील अधिकारी यांचे सोबत संयुक्तरित्या/ आज मौजे चाविंद्रा गांव येथे धाड टाकली असता अंदाजे 2500 किलो प्लॅस्टिक पिशव्या व रोल माल जप्त करण्यात आलेला आहे. संबंधित दुकानदार यांना महाराष्ट्र प्लॅस्टिक व थर्माकॉल अविघटनशील वस्तूंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी, साठवणूक) अधिनियम 2018 अन्वये अविघटनशील प्लॅस्टिक साठवणुक करीता रक्कम रु. 5,000/- दंड आकारण्यात आला आहे. आशी माहिती जनसंपर्क अधिकारी श्रीकांत परदेशी यांनी दिली

# ठाणे जिल्हा परिषदेच्या माध्यमातून उल्हासनदीतील जलपर्णी काढण्याचे काम सुरू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** उल्हासनदीतील जलपर्णी काढण्याचे काम ठाणे जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायतीने सुरू केले आहे, परंतु ज्या महानगरपालिका, एमआयडीसी, नगरपरिषदा, नगरपंचायती या पाण्यावर करोडो रुपये कमवतात, पाणीपट्टी द्वारे वसूल करतात, त्यांचे नक्की काय काम?शिवाय, पर्यावरण विभाग, प्रदूषण नियंत्रण मंडळ, काय करते? असा सवाल या गावातील ग्रामस्थ विचारत आहेत,५०ते६०लाख नागरिक उल्हासनदी च्या पाण्यावर अवलंबून आहेत,कर्जत, लोणावळा च्या राजमाची ठिकाणाहून ही नदी उगम पावते, पुढे, कर्जत, बदलापूर, अंबरनाथ, कल्याण असा १५०किमी चा प्रवास करून



खाडीला मिळते, परंतु या नदीत कर्जत, बदलापूर, हेंद्याचा पाडा, रायते, म्हारळचा नाला असे दूषित सांडपाणी नदीत सोडले जाते, या नदीतून, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, उल्हासनगर पालिका, बदलापूर नगरपरिषद, अंबरनाथ नगरपंचायत, एमआयडीसी, अनेक खाजगी संस्था, संघटना, फार्महाऊस, पाणी उचलतात, बक्कळ पैसा कमवतात, परंतु नदी स्वच्छतेचा प्रश्न आल्यावर मात्र हे गायब होतात,सध्या उल्हास नदीचे पात्र हे जलपर्णी या वनस्पतीने व्यापले आहे, ती काढणे, नष्ट करणे हे खूपच खर्चिक आहे, यापूर्वी ही यावर शासनाने लाखों रुपये खर्च केला होता. पण तो पाण्यात गेला. मात्र ठाणे जिल्हा परिषदेने आपली जबाबदारी इतरांप्रमाणे झटकली नाही.

कल्याण तालुक्यातील म्हारळ, वरप, कांबा, मानिवली, आपटी मांजर्ली, वसत शेलवली, रायते, आणे भिसोळ या ग्रामपंचायतीपैकी कांबा, म्हारळ, वरप यांनी आपल्या कुवतीप्रमाणे ही जलपर्णी काढण्यास सुरुवात केली आहे. तर मानिवली, रायते, आपटी, वसत,आणे भिसोळ, या अत्यल्प उत्पन्नाच्या ग्रामपंचायतीना हे शक्य नाही, या सर्वच ग्रामपंचायतीना दिड ते दोन किलोमीटर पेक्षा जास्त नदी किनारा असल्याने ते जलपर्णी कशी काढणार? ऐवढा निधी कसा मिळणार? ऐवढे मनुष्यबळ कोठून आणणार? असे शेकडो प्रश्न या ग्रामस्थांना पडले आहेत, विशेष म्हणजे ज्यांच्याकडे निधी भरपूर आहे, मनुष्यबळ आहे, पैसा कमवतात? ते हाताची घडी व तोंडावर बोट ठेऊन गप्प बसले आहेत, आणि यांच्या कडे ना निधी, ना मनुष्यबळ अशा ग्रामपंचायती मात्र 'खारीचा वाटा, समजून जलपर्णी काढत आहे, त्यामुळे 'कोणाच्याखांद्यावर, कोणाचे ओझे, अशी म्हणण्याची वेळ नागरिकांवर आली आहे.

# केडीएमसी शिक्षण विभागाची बाल रक्षा अभियान कार्यशाळा संपन्न !



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

बालकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने घ्यावयाची खबरदारी या अनुषंगाने शालेय बस वाहतूक, बालकांची सायबर सुरक्षितता, स्कूल बस चालकाबाबत अनुचित प्रकार घडल्यास करावयाची कार्यवाही व इतर सुरक्षिततेबाबत माहिती शिक्षकांना व्हावी या अनुषंगाने कार्यशाळेत मार्गदर्शकांनी उत्तम मार्गदर्शन केले.सदर कार्यशाळेचे आयोजन महापालिका शिक्षण विभागाचे उपायुक्त संजय जाधव, प्रशासन अधिकारी रमेश चव्हाण, शिक्षणाधिकारी विजय सरकटे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहाय्यक कार्यक्रम अधिकारी अर्चना जाधव यांच्या नियोजनानुसार सुभेदार वाडा माध्यमिक विद्यालय कल्याण (प.) येथे करण्यात आले होते. बाल रक्षा अभियान कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून, समतोल फाऊंडेशन ठाणे या संस्थेचे विजय जाधव तसेच अनिल कुऱ्हाडे जि.प. ठाणे, सुभेदारवाडा हायस्कूलच्या उपमुख्याध्यापिका रंजना पाटील, प्राथमिक विभागाच्या पोतदार मॅडम यांनी सुयोग्य असे मार्गदर्शन उपस्थित प्रशिक्षणार्थींना केले. शिक्षणाधिकारी विजय सरकटे यांनी विद्यार्थी सुरक्षितते बाबत अधिकच्या बाबी प्रशिक्षणार्थींना अवगत करत मार्गदर्शन केले. तांत्रिक सहाय्य चंदन माने यांनी केले तर समन्वयक म्हणून गुरुनाथ इसामे व प्रदीप भोईर यांनी कामकाज पाहिले

# स्टेम प्राधिकरणाची जलवाहीनी फुटल्याने भिवंडीत कमी दाबाने पाणीपुरवठा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** भिवंडी शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या स्टेम प्राधिकरणाची मुख्य जलवाहीनी मंगळवारी रात्री फुटली असून तिच्या दुरुस्तीचे काम बुधवारी दिवसभर सुरू होते. यामुळे भिवंडी शहरातील पाणी पुरवठ्यावर बुधवारी परिणाम झाला असून काही भागांचा पाणी पुरवठा ठप्प झाला होता तर, काही भागात कमी दाबाने पाणी पुरवठा होत होता. ऐन उन्हाळ्यात हा प्रकार घडल्याने नागरिकांना पाणी टंचाईच्या समस्येला सामोरे जावे लागले.

भिवंडी महापालिका क्षेत्रात तीन स्त्रोतांमार्फत दररोज १२० दशलक्षलीटर इतका पाणी पुरवठा करण्यात येतो. त्यापैकी स्टेम प्राधिकरणाकडून ७३ दशलक्षलीटर, मुंबई महापालिकेडून ४२ दशलक्षलीटर आणि वऱ्हाळदेवी तलाव पाणी योजनेतून ५ दशलक्षलीटर इतके पाणी पुरवठा करण्यात येतो. हे तिन्ही स्त्रोत शहरातील पाणी पुरवठ्यासाठी महत्वाचे मानले जातात. भिवंडी शहराला पाणी पुरवठा करणारी स्टेम प्राधिकरणाची ६०० मिलिमीटर व्यासाची जलवाहीनी मंगळवारी रात्री फेने गावात फुटली. तिच्या दुरुस्तीचे काम पालिकेने तातडीने हाती घेतले. बुधवारी दिवसभर हे काम सुरू होते. यामुळे कामतघर, नारपोली, साठे नगर, ओसवालवाडी, रेल्वे स्टेशन रोड, ताडाली, भाग्यनगर, विनायक नगर, चंदन बाग आणि देवजी नगर या भागांचा पाणी पुरवठा ठप्प झाला होता. स्टेम प्राधिकरणाची फुटलेली जलवाहीनी दुरुस्तीचे काम करण्यात येत आहे. मात्र, दुरुस्तीनंतर शहरात पूर्ण क्षमतेने पाणीपुरवठा करणे शक्य होणार नाही. यामुळे शहरातील कल्याण रोड, गुलजार नगर, चव्हाण कॉलनी, बाला कंपाऊंड, खंडू पाडा, निजामपुरा, वंजारपट्टी नाका, कोंबडपाडा, नजराणा कंपाऊंड, गोपाल नगर, गोकुळ नगर, मिल्लत नगर, अवचित पाडा, आमपाडा, म्हाडा कॉलनी या संपूर्ण परिसरामध्ये स्टेम कडून होणारा पाणीपुरवठा कमी दाबाने व कमी प्रमाणात होईल, असे पालिका प्रशासनाने कळविले आहे. जलवाहीनी दुरुस्तीचे काम महानगरपालिकेकडून तातडीने हाती घेण्यात आले असून बुधवार मध्यरात्रीपर्यंत पाणीपुरवठा सुरळीत होईल, असे पालिकेने स्पष्ट केले आहे.

# मुंबई जिल्हा टेनिस टुर्नामेंट मध्ये शहापूरच्या शुभदा व तेजस्विनीची छाप!



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**खर्डी :** शुभदा व तेजस्विनी या शहापूर तालुक्यातील दुर्गम भागातील दोन बहिणींनी मुंबई येथे झालेल्या टेबल टेनिस सिंगल स्पर्धेत सर्वच स्पर्धकांना धूळ चारत प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावून शहापूरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.घरची परिस्थिती हलाखीची असूनही मुलींच्या आवडत्या खेळा कडे असलेली ओढ पाहून फुलांचा व्यवसाय करणाऱ्या आई-वडिलांनी मुलींचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मोगरा शेतीची जमीन विकून दोन्ही बहिणींना मुंबई येथे प्रशिक्षण दिले.

शहापूर तालुक्यातील कवडास येथील श्री.दिपक(नाना) घोडविंदे व जयमाला घोडविंदे हे दाम्पत्य व काका सुनील घोडविंदे यांनी नोकरी सोबत फूल व्यवसाय करत आपल्या दोन्ही मुली शुभदा व तेजस्विनी ह्यांचा सांभाळ करीत असून त्यांच्या आवडी-निवडी जोपासण्यासाठी ते दिवसरात्र एक करून मेहनत करीत आहेत.मुलींना पाचव्या वर्षांपासूनच टेबल टेनिस खेळण्याची आवड निर्माण झाल्याने त्यांनी मुलींच्या या आवडत्या खेळात प्राविण्य मिळावे यासाठी परिस्थिती हलाखीची असूनही मुंबई येथील तज्ञ प्रशिक्षकांकडे आपल्या मुलींना टेबल टेनिसचे प्रशिक्षण मिळावे यासाठी मोगऱ्याची बाग असलेली जमीन विकून मुलींना कवडास येथील राहत्या घरीच प्रॅक्टिस करतायावी यासाठी टेनिस कोर्ट तयार केला. त्यांच्या आवडत्या टेबल टेनिस क्षेत्रात सेरेना विल्यम्स व विनस विल्यम या दोघी बहिणींसारखं नाव कमवून भारताच प्रतिनिधित्व करावं अशी शुभदा व तेजस्विनीच्या आई वडिलांची इच्छा आहे.

शहापूर येथील पी एस.देशमुख शाळेत 5वीत शिक्षण घेत आहेत.मुलींची टेबल टेनिस खेळण्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी वडिलांनी मुंबई येथील आझाद मैदानात दोघींना प्रशिक्षण लावले असून ते पूर्ण करण्यासाठी सद्या रोज दुपारी तीन वाजताच्या लोकलने मुंबईला पाच वाजता पोचून संध्या 5.30 ते रात्री 8 वाजेपर्यंत टेबल टेनिस चे प्रशिक्षण करून रात्री दहा-साडेदहा वाजेपर्यंत रोज घरी येत असतात.मुलाच्या आवडी निवडी जपत व आपले मुलांकडून स्वप्न पूर्ण करून घेण्यासाठी रोज होणारी ओढाताण कौतुकास्पद असून शुभदा व तेजस्विनी च्याआई वडिलांच्या दूरदृष्टीला,जिद्दीला आणि दोन्ही मुलींच्या मेहनतीला सलाम...!

# घरबसल्या करता येणार विठ्ठल रुक्मिणीच्या पुजेची नोंदणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पंढरपूर (ता.19) -** श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या नित्यपुजा, पाद्यपूजा, तुळशी अर्चन पूजा, चंदन उटी पूजा इत्यादी सर्व प्रकारच्या पूजा श्री. विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीकडून भाविकांना उपलब्ध करून देण्यात येतात. दि. 01 एप्रिल ते 31 जुलै, 2025 या कालावधीतील पुजांची ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करण्याची सुरवात दि.25 मार्च रोजी स.11.00 पासून होत असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

याबाबत मंदिर समितीच्या दि. 03 मार्च रोजीच्या सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत निर्णय घेण्यात आला होता. यासाठी संगणक प्रणाली विकसित करण्यात आली आहे. भाविकांना पूजेची नोंदणी https://www.vitthalrukminimandir.org या मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरून करता येणार आहे.

यापूर्वी पहिल्या टप्प्यात दि. 7



ऑक्टोबर ते 31 डिसेंबर 2024 व दुसऱ्या टप्प्यात दि.1 जानेवारी ते 31 मार्च 2025 या कालावधीतील श्रींच्या नित्यपूजा, तुळशी अर्चन पूजा व पाद्यपूजा ऑनलाइन नोंदणीसाठी भाविकांना उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. यामध्ये महाराष्ट्र राज्याच्या विविध कानाकोपऱ्यातून व देशभरातून कर्नाटक, आसाम, आंध्र प्रदेश इत्यादी राज्यातील भाविकांनी पूजेची नोंदणी केली होती. यास भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

आता, तिसऱ्या टप्प्यात दि. 01 एप्रिल ते 31 जुलै, 2025 या कालावधीतील सण, उत्सव व गर्दीचे दिवस वगळून इतर दिवशीच्या श्रींच्या नित्यपूजा, तुळशी अर्चन पूजा, पाद्यपूजा व चंदनउटी पूजा ऑनलाइन नोंदणीसाठी भाविकांना उपलब्ध करून देण्यात येत आहेत. ऑनलाइन नोंदणीसाठी काही अडचणी आल्यास मंदिर समितीच्या नित्योपचार कार्यालयातून नोंदणी करून देण्यास मदत व आवश्यक ते मार्गदर्शन करण्यात येईल. याबाबतची अधिक माहिती, अटी व शर्ती मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच अधिक माहितीसाठी मंदिर समितीच्या 02186 -299299 या दूरध्वनी क्रमांकावर भाविकांनी संपर्क साधावा.

ग्रीष्मऋतूतील वाढत्या उन्हापासून श्रीविठुरायाला शीतलता मिळावी, यासाठी दरवर्षी चैत्र पाडव्यापासून मृग नक्षत्राने पावसाळ्याची सुरुवात होईपर्यंत दररोज दुपारी चंदनउटी पूजेची परंपरा आहे. त्यानुसार यंदाच्या या पूजेला गुढीपाडव्यापासून पासून सुरुवात होत आहे, या चंदनउटी पूजेची नोंदणी देखील ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार आहे, असे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगितले.

### चंदनउटी पूजेचा देखील समावेश

**श्री विठ्ठल व श्री रुक्मिणीमातेच्या नित्यपूजेसाठी अनुक्रमे रु.25,000/-, रू.11,000/- तसेच पाद्यपूजेसाठी रू.5,000/- व तुळशी अर्चन पूजेसाठी रू.2100/- तसेच श्री विठ्ठल व श्री रुक्मिणीमातेच्या चंदनउटी पूजेसाठी अनुक्रमे रु.21,000/-, रू.9,000/- इतके देणगी मुल्य आहे.**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com

# डॉ. रुपाली मोकाशी यांचे शिलाहारकालीन स्त्री जीवनावर व्याख्यान



दै. ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी

**कल्याण :** चांद्रसेनीय कायस्थ प्रभू सभा कल्याण च्या वतीने प्रतीवर्षा प्रमाणे, दिनांक १६ मार्च २०२५ रोजी कल्याण च्या नुतन हायस्कूल मध्ये जागतीक महिला दिन साजरा करण्यात आला.भारतमाता पुजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

सदर कार्यक्रमास कल्याण मधील प्रख्यात ईतिहास तज्ञ डॉ.सौ.रुपाली प्रविण मोकाशी यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांचे शिलालेखातील स्त्री वशिलाहारकालीन स्त्री जीवन या विषयावर उद्बोधक व्याख्यान झाले. तत्पूर्वी समाजातील जेष्ठ व कर्तृत्ववान महिलांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर PG's Skill Development

### प्रशांत गिरजापुरे यांच्या आनंदाच्या कार्यशाळेतून महिलांना मार्गदर्शन

Agency चे प्रशिक्षक श्री प्रशांत गिरजापुरे यांची आनंदाची कार्यशाळा हा रंजक व उद्बोधक कार्यक्रम झाला. तत्प्रसंगी संस्थे च्या विद्यमान अध्यक्ष सौ.आर्पिता ल.जयवंत / उपाध्यक्ष श्री प्रविण प्रभाकर राजे/ सचिव सौ.अर्चना भुषण कर्णिक व माजी अध्यक्ष श्रीमती संगीता तुंगारे हजर होते.

सर्व आजी-माजी सहकारी यांच्या प्रयत्नामुळे हा उपक्रम राबविला गेला, असे संस्थेचे उपाध्यक्ष श्री प्रविण राजे यांनी नमूद केले.सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. सिद्धि ओंकार राजे यांनी केले.

# बदलापूर उपजिल्हा रुग्णालयात मोफत महाआरोग्य शिबीर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
ठाणे : राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रमांतर्गत व जिल्हा एड्स नियंत्रण कक्ष, सामान्य रुग्णालय, ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण सुरक्षा केंद्र कार्यरत असून, त्यामार्फत एचआयव्ही/एड्स संवेदनशीलता व जागरुकता कार्यक्रम आयोजित केला आहे. त्यामध्ये जिवित हक्क, वर्तन समस्येतून मुक्तीविषयक समुपदेशन, त्यावरील उपाय, संवध व्यवस्थापन यावर कार्य केले जाते. संपूर्ण सुरक्षा केंद्रांतर्गत दि.20 मार्च 2025 रोजी उपजिल्हा रुग्णालय, बदलापूर येथे सकाळी 9 वाजता मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या महाआरोग्य शिबिरामध्ये विविध प्रकारच्या रक्त चाचण्या तसेच गुप्तरोग व क्षयरोगविषयी माहिती व तपासणी, मधुमेह तपासणी, दंत तपासणी, कान/नाक/घसा तपासणी, ईसीजी, आयुर्वेदिक सेवा, आभा कार्ड, इतर सुविधा तसेच विविध वैद्यकीय तपासणी करण्यात येणार आहेत.तरी, या महाआरोग्य शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.कैलास पवार यांनी केले आहे.

## संक्षिप्त

### शिधापत्रिकाधारकांनी ई के.वाय.सी. पूर्ण करावी

ठाणे : महाराष्ट्र शासनाच्या सर्व राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत पात्र शिधापत्रिकाधारकांची व शिधापत्रिकेत नाव समाविष्ट असलेल्या सदस्यांची ई- के.वाय.सी. दि.31 मार्च 2025 पर्यंत पूर्ण करणे आवश्यक असल्याने ही प्रक्रिया सुलभ करण्यासाठी राष्ट्रीय सूचना केंद्र, नवी दिल्ली यांनी "मेरा ई-के.वाय.सी." मोबाईल ॲपलिकेशन विकसित केले आहे. त्यानुसार सर्व शिधापत्रिकाधारकांनी त्यांच्या मोबाईलमध्ये "मेरा ई-के.वा.सी." ॲपलिकेशनद्वारे ई-के.वा.सी. पूर्ण करता येईल.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत ज्या शिधापत्रिकेवर अन्न धान्य मिळत आहे, अशा सर्व लाभार्थ्यांनी रास्तभाव दुकानामध्ये जाऊन ई-के.वाय.सीची प्रक्रिया पूर्ण केली नसेल तर "मेरा ई-के.वाय.सी." मोबाईल प्रणालीद्वारे किंवा नजिकच्या अशिवा दुकानात जाऊन/शिधावाटप कार्यालय क्र.36 फ येथे जाऊन दि.31 मार्च 2025 पर्यंत ई.के.वाय. सी. पूर्ण करावे, असे आवाहन शिधावाटप कार्यालय क्र.36 फ, ठाणे यांच्यामार्फत करण्यात आले आहे.

### श्री रामकृष्ण सेवा ट्रस्ट तर्फे गरजूंना अन्नधान्य वितरण

### पक्षांसाठी केली पाण्याची सोय



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : श्री रामकृष्ण सेवा ट्रस्ट कल्याणतर्फेअन्न क्षेत्रात सालाबादप्रमाणे होळी निमित्ताने यंदाही संस्था संचालक व उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते गरजू लोकांना अन्नधान्य सामानाचे वितरण करण्यात आले. तसेच पक्षांसाठी चणे आणि पाण्याची सोय करण्यात आली. आधारवाडी जवळ असलेल्या अन्न क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून दररोज गरजू लोकांना मोफत भोजन व दरमहा अन्नधान्य सामानाच्या कीटचे वितरण करण्यात येत आहे.
या संस्थेचे सेवा कार्य मानव सेवा हीच प्रभु सेवा ह्या पू. डोंगरे महाराज यांनी दिलेल्या सुत्रांच्या प्रेरणेने होत आहे. यासाठी रामकृष्ण सेवा संस्थाचे संचालक जसु चंदाराणा व विनु तन्ना, खूपच मेहेनत गेत आहे. या कामी छबिल कारीया, मितुल देसाई, वन्स चंदाराणा, सुभाष रायचूरा, राजिव चंदाराणा, नटु खीमानी, विष्णूकुमार चौधरी, रश्मी चंदाराणा, रवि चौधरी, मोनीश चंदाराणा व दयाल यांच्या हस्ते ६५ गरजु लोकांना अन्नधान्य किट वितरण करण्यात आले. त्याच बरोबर पक्षांना चणे व पिण्याच्या पाण्याची सोय अन्न क्षेत्रात करण्यात आली. या कार्यक्रमात अनेक लोक सहभागी झाले होते.

### ग्रामपंचायत आबिटघर वतीने महिला मेळाव्याचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
शहापूर ग्रामिण ; ग्रुप ग्रामपंचायत आबिटघर या ग्रामपंचायत विभाग वतीने येथे महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये हळदी कुंकू व मोफत स्त्री रोग तपासणी शिबिर कार्यक्रम पार पडणार आहे.
महिलांना योग्य मार्गदर्शन मिळावे यासाठी वाडा तालुक्यातील आबिटघर या ग्रामपंचायत वतीने महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. सदर मेळाव्या दरम्यान बुधवार दि. 19 मार्च रोजी हळदी कुंकू तर शनिवार 22 मार्च रोजी प्रारंभ कला ॲकेडमी, ठाणे यांच्या सहकार्याने मोफत स्त्रीरोग तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे.
दरम्यान, या कार्यक्रमासाठी सिने कलाकार अभिनेत्री रसिका धामणकर यांची उपस्थिती लाभणार असून या कार्यक्रमात जास्तीत जास्त महिलांनी सहभाग घ्यावा असे आवाहन सरपंच साक्षी साठे व ग्रामपंचायत विभागांनी केले आहे.

## कूडवली गावाच्या हद्दीत
# शहापूर बसला अपघात

### १६ प्रवासी किरकोळ जखमी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुरबाड : मुरबाड आगारातून सुटणारी मुरबाड शहापूर लेनाड मार्गे जाणारी बस कुडवलीच्या हद्दीत पलटी होऊन झालेल्या अपघातात बसमधील १६ प्रवासी किरकोळ जखमी झाल्याची घटना बुधवारी साडेबारा वाजण्याच्या दरम्यान घडली आहे. सुदैवाने सर्व प्रवासी सुखरूप आहेत
याबाबत मिळालेली माहिती अशी की मुरबाड आगारातून सुटणारी शहापूर डेपोची बस ही लेनाड मार्गे शहापूरला जात असताना कुडवली गावच्या हद्दीत सदरची बस पलटी झाल्याने अपघात झाला आहे.सदर बस क्रमांक एमएच२०बीएल १४७१ ही अपघात झालेली बस शहापूर आगाराची आहे.



या अपघातात बसमधील १६ ते१७ प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. त्यांना उपचारासाठी मुरबाड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहेत. त्यांना तात्काळ आर्थिक मदत म्हणून एसटी महामंडळाकडून प्रत्येकी ५०० रुपये प्रमाणे देण्यात आल्याची माहिती मुरबाड आधार प्रमुख योगेश मुसळे यांनी दिली आहे.

# पेणमध्ये बौद्ध समाजाचा निषेध मोर्चा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
पेण : बोधगया महाबोधी बुद्धविहार बौद्धांच्या ताब्यात द्यावे, अशी मागणी करीत बौद्ध समाज बांधवांकडून पेणमध्ये मोर्चा काढून निषेध नोंदवण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मोर्चा तहसील कार्यालयापर्यंत काढण्यात आला.
जगातील तमाम बौद्ध धर्मीयांचे श्रद्धास्थान असणारे बोधगयातील महाबोधी विहार बौद्धांच्या ताब्यात मिळावे, याकरिता मागच्या काही दिवसांपासून बोधगया येथे भिक्खू संघ आंदोलनास बसले असल्याने त्यांना राज्यातून जाहीर पाठिंबा दिला जात आहे. पेण तालुक्यातील सर्व बौद्ध समाजबांधवांनी मोर्चा काढून तहसीलदार यांना निवेदन दिले. या वेळी बोलताना ॲड. प्रमोद कांबळे म्हणाले की, महाबोधी महाविहार हे सनातनी लोकांनी आपल्या ताब्यात ठेवले आहे. त्याकरिता गेल्या अनेक वर्षांपासून आपला समाज लढा देत आहे. त्यामुळे आमचा लढा हा शांततेच्या मार्गाने आहे, त्याला आक्रमक होण्यास लावू नका. आमची अस्मिता महाबोधी विहाराशी आहे, त्यामुळे तो तत्काळ बौद्धांच्या ताब्यात द्या,अशी मागणी केली. तर, येणारा काळ पाहता आपण संघटन मजबूत केले पाहिजे. आपले धार्मिकस्थळ ज्यांच्या ताब्यात आहे ते आपल्या ताब्यात मिळवण्यासाठी भिक्खू संघांनी जी भूमिका घेतली आहे यासाठी वेळप्रसंगी त्याठिकाणी जाणे आवश्यक असल्याचे भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष चंद्रकांत सोनवणे यांनी सांगितले. यावेळी अनेक जण उपस्थित होते.

# उल्हासनगरात एवरेस्ट कंपनीचा नकली मसाला

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
उल्हासनगर : एवरेस्ट मसाल्यांच्या नावाखाली नकली मसाले विक्रीचा मोठा गैरप्रकार उल्हासनगरात उघडकीस आला आहे. या प्रकरणी उल्हासनगर पोलिसांनी सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. विश्वासाने घेतल्या जाणाऱ्या मसाल्यांच्या नावाखाली ग्राहकांची फसवणूक होत असल्याची माहिती मिळताच एवरेस्ट कंपनीच्या अधिकाऱ्यांनी पोलिसांच्या मदतीने कारवाई केली आणि हजारो रुपयांचे बनावट मसाले जप्त करण्यात आले. आता या गैरव्यवहाराच्या मुळाशी कोण आहे? हे नकली मसाले कुठून येतात? याचा तपास सुरू आहे.
उल्हासनगरातील बेबस चौक, खेमानी परिसरातील काही दुकानदार नकली एवरेस्ट मसाले विकत असल्याची माहिती कंपनीच्या प्रतिनिधींना मिळाली. या प्रकाराची खातरजमा झाल्यानंतर एवरेस्ट कंपनीच्या अधिकाऱ्यांनी उल्हासनगर पोलिसांच्या मदतीने छापे टाकले. या कारवाईत दिलीप सिंग, सोहेल शेख, किशोर धनराजमल आहूजा, दिलीप सिंह, अमजद शेख आणि सुनील धनराजमल आहूजा यांच्या दुकानांवर छापे मारण्यात आले आणि मोठ्या प्रमाणावर बनावट चिकन मसाला व मटन मसाला जप्त करण्यात आले. या प्रकरणी एवरेस्ट कंपनीचे प्रतिनिधी इयान डेजवन गोम्स यांच्या तक्रारीवरून सहा जणांविरुद्ध कॉपीराइट कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





**सहा जणांवर गुन्हा दाखल**

### अजून किती नकली पदार्थ बाजारात?

या कारवाईने नकली मसाले विकणाऱ्या टोळीचा पर्दाफाश झाला असला तरी, अजून किती ठिकाणी असे बनावट मसाले विकले जात आहेत? याचा शोध घेणे गरजेचे आहे. खाद्य सुरक्षा आणि ग्राहकांच्या आरोग्याशी संबंधित असलेल्या अशा प्रकारांवर अधिक कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे. उल्हासनगर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणात आणखी काही लोक सामील असण्याची शक्यता आहे, त्यामुळे तपास अधिक गतीने सुरू आहे.

### ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ? - पोलिसांचा पुढील तपास सुरू

बनावट खाद्यपदार्थ आणि मसाले केवळ आर्थिक फसवणूक नसून ते आरोग्यासाठीही घातक ठरू शकतात. त्यामुळे हे मसाले नक्की कुठे आणि कसे तयार केले जात होते? त्याच्या मागे मोठे रॅकेट आहे का? याचा शोध घेण्यासाठी उल्हासनगर पोलीस आता या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत. या छाप्यामुळे नकली उत्पादन विकणाऱ्या भेसळखोरांना मोठा धक्का बसला आहे. पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, अविश्वासार्ह ठिकाणांहून मसाले किंवा कोणतेही खाद्यपदार्थ खरेदी करताना सतर्क राहा आणि संशयास्पद माहिती मिळाल्यास त्वरित पोलिसांशी संपर्क साधा.

## माजी आ.प्रकाश भोईर यांना मातृशोक



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : कल्याण पश्चिम विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार तथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रदेश सरचिटणीस, कल्याण शहर अध्यक्ष प्रकाश भोईर यांच्या मातोश्री लक्ष्मीबाई भोईर (८२) यांचे मंगळवारी सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर लालचौकी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी कल्याण डोंबिवलीसह सर्वच राजकीय पक्षांचे पदाधिकारी कार्यकर्ते, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, कल्याणकर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात मुले, मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# खरेदी विक्री संघाच्या भात खरेदी गैरव्यवहाराविरोधात उपोषण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुरबाड ; मुरबाड तालुका शेतकरी संघ लि. यांनी भात खरेदीमध्ये सन २०२१-२२ मध्ये केलेल्या गैरव्यवहारा संदर्भात अनेक तक्रारी दाखल होऊनही सबंधित दोषीवर कारवाई न झाल्याने माहिती अधिकार कार्यकर्ता फेडरेशनचे संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर यांच्या नेतृत्वाखाली शंकर अनंता वडवले ( उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य माहिती अधिकार कार्यकर्ता फेडरेशन) हे दि. १८ पासून मुरबाड तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसले आहेत. मुरबाड तालुक्यातील शेतकरी, सामाजिक संघटना, विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी आमरण उपोषणास पाठिंबा देण्यासाठी उपस्थित दाखवित आहेत. या मध्ये फेडरेशनचे ठाणे- पालघर जिल्हा अध्यक्ष अशोक पडवळ, मुरबाड तालुका अध्यक्ष दिलीप पवार, सामाजिक कार्यकर्त्या योगिताताई शिर्के, प्रवक्ता संतोष राऊत, शिवसेनेचे संतोष विशे, आरपीआयचे तालुका अध्यक्ष दिनेश उघडे, अन्याय अत्याचार निर्मूलन समितीचे आण्णा साळवे, सीटु संघटनेचे दिलीप कराळे, माजी सभापती दिपक पवार, सुरेश बांगर, संतोष पवार यांनी पाठिंबा दिला आहे.
उपोषणातील प्रमुख मागण्या खालील प्रमाणे
१) भात खरेदीमध्ये झालेल्या भ्रष्टाचारा संबंधित दोषींवर तात्काळ कारवाई करण्यात यावी.



२) सन २०१५ ते आजपर्यंत मागणी केलेल्या माहिती संदर्भात अभिलेख गहाळ करणाऱ्या अधिकाऱ्यांवर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात यावेत.
३) खरेदी विक्री संघावर सध्या प्रशासक असताना देखील जे राजकीय कार्यकर्ते भात खरेदीमध्ये हस्तक्षेप करत आहेत त्यांची सी.सी. टिव्ही फुटेज तपासणी करून कारवाई करण्यात यावी. माहिती अधिकार फेडरेशनने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, शासनाच्या आदेशानुसार मार्केटिंग फेडरेशन यांनी नियुक्त केलेल्या जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांनी मुरबाड तालुका शेतकरी संघ लि. यांनी हंगामी सन २०२१/२०२२ ची भात खरेदी करण्यास सुरुवात केली. यासाठी त्यांनी शेतकऱ्यांना प्रथम टोकन दिले आणि अनुक्रमे भात घेण्यास सुरुवात केली. त्यानंतर मॅनेजमेंट कोट्यद्वारे भात घेण्यास सुरुवात केली. यात आपले जवळचे खासकरून व्यापारी यांच्याद्वारे शेतकऱ्यांचे सातबारा उतारे खाते नंबर संबंधिता मार्फत घेऊन भात घेण्यास सुरुवात केली. त्यामुळे आपला भात घेतला जाणार नाही अशी नैराश्याची भावना इतर शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली. त्याचाच फायदा उचलत कोकण नंबर प्रमाणे भाग न घेता संबंधित चेअरमन आणि सचिव यांनी प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार केला समजते. संबंधित भ्रष्टाचार हा खालील प्रमाणे झालेला आहे.
१) बारदानाच्या वजनापेक्षा जास्त भात घेणे- बारदानाच्या वजनापेक्षा जास्त भात येऊ नये असा शासनाचा नियम असताना प्रतिक्विंटल अडीच किलो भात जास्त घेतले त्यावर ती साधारण प्रमाणे ९६०००/-(शहाण्णव हजार) क्विंटल जास्त भात घेतल्याचे समजते. म्हणजे शासनाने प्रति क्विंटल दोन टक्के घट आणि त्यांनी ज्यादा घेतलेले भात मिळुन प्रति किलो साडेचार किलो जागा भात संघाकडे जास्त आले. सहा महिन्याच्या आत भात उचलल्यास साधारणपणे दोन किलो घट निर्माण होते म्हणजे संघाकडे यावर्षी प्रतिक्विंटल २.५० किलो प्रमाणे ९६०००२.५० किलो २४०० क्विंटल भात संघाकडे जास्त आहे त्याचे प्रतिक्विंटल १८००/- होतात जास्त सदरचे भात आपले जवळचे परिचित आप्तेष्ट यांच्या नावावर टाकले गेले. आपण दैनंदिन वही आणि दैनंदिन सी.सी. टीव्ही फुटेज पहिले असते तर सदर शेतकरी भात देण्यासाठी आलेले नाहीत याची खात्री पटली असती. परंतु तक्रार असतानाही संबंधित अधिकारि यांच्या कडून अशा प्रकारे कार्यवाही करण्यात आली नाही. २४००×१८०० ४३.२०.०००/-
२) हमाली सुतलीचे पैसे घेणे- यासाठी शासनाकडून प्रतिक्विंटल १२ रुपये देण्यात येतात असे समजते. मात्र संघाने प्रत्येक शेतकऱ्याकडून हमालीसाठी प्रति क्विंटल १२ रुपये घेतले आहेत म्हणजेच ९६०००×१२= ११५२०००/- एवढी रक्कम शेतकऱ्याकडून जमा केल्याची समजते.
३) बारदान घोटाळा - शासनाकडून बारदान मिळत नसल्याचे सांगून भात खरेदी बंद ठेवली गेली आणि ज्या शेतकऱ्याकडे तरपटे बारदान आहे त्यांनीच भात आणावे असे सांगितले मग यासाठी शासनाकडून दिलेले बारदान गेले कुठे याची चौकशी व्हावी.
४) ऑनलाईन घोटाळा - प्रथम भाग देणाऱ्या शेतकऱ्यांना वेळेवर पैसे मिळाले नाहीत मात्र ज्या व्यापाऱ्याने प्रतिक्विंटल १०० रुपये दिले त्यांचे पैसे त्यांना वेळेवर देण्यात आले आपण शेतकऱ्यांना दिलेले टोकन भात खरेदी दिनांक त्यांच्या खात्यावर पैसा जमा झाल्याची तारीख याची चौकशी केल्यास सदर बाब उघड होईल.
५) मॅसेज न देणे - टोकन नंबर दिल्यास शेतकऱ्यास भात केंद्रावर आणण्यासाठी निश्चित तारिख आणि वेळ फोन करून किंवा मेसेज करून कळवणे हे बंधनकारक असताना ते कळविले नाही त्यामुळे टोकन देऊनही शेतकऱ्यांचा भात त्यावेळेस तसाच पडून राहिला त्यामुळे शेतकऱ्यांना त्यावर्षीच्या हंगामासाठी खत बी बियाणे कसे आणायचे हा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता तसेच शेतकरी आर्थिक अडचणीत आला होता याबाबत शेतकरी व पत्रकारांनी केलेल्या तक्रारीकडे जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांनी हेतू पुरस्कार दुर्लक्ष केले असल्याचे त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

# समुद्राचे पाणी पिण्यायोग्य करण्यासाठीच्या प्रकल्पासाठी निविदा प्रक्रिया

### - उद्योग मंत्री उदय सामंत

मुंबई : समुद्राच्या पाण्याचे विलोपन (Desalination) हा प्रकल्प मुंबईसाठी हाती घेतला असून या प्रकल्पासाठी आंतरराष्ट्रीय निविदा प्रक्रिया राबवली जाणार असल्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी विधानपरिषदेत सांगितले.
सदस्य राजहंस सिंह यांनी उपस्थित केलेल्या मुंबई शहर व उपनगरातील पाणीपुरवठाविषयी लक्षवेधीला सूचनेला उत्तर देताना श्री. सामंत बोलत होते.
उद्योग मंत्री श्री सामंत म्हणाले, मुंबईतील वाढत्या पाणीटंचाईला तोंड देण्यासाठी राज्य सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. समुद्राच्या खाऱ्या पाण्याचे रूपांतर पिण्यास योग्य पाण्यात करण्यासाठीच्या प्रकल्पासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर निविदा प्रक्रिया तातडीने राबवली जाणार आहे. मुंबईतील नागरिकही पाणीटंचाईचा मोठ्या प्रमाणावर सामना करत आहेत. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेला आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पाणीपुरवठा सुधारण्याचे निर्देश दिले जातील.उद्योग मंत्री श्री .सामंत यांनी सांगितले की, १२ नोव्हेंबर २०१३ रोजी मंजूर झालेला गारगाई प्रकल्प पूर्ण करण्यासाठी चार वर्षे लागतील. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबई महानगरपालिकेला ४४० दशलक्ष लिटर अतिरिक्त पाणीपुरवठा शक्य होईल, ज्यामुळे मुंबईतील पाणीटंचाई काही प्रमाणात दूर होईल. पाणीपुरवठा यंत्रणेतील गळती (लीकेजेस) आणि अनधिकृत कनेक्शन रोखण्यासाठी अत्याधुनिक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. एमआयडीसीच्या पाईपलाइनमध्ये अशा तंत्रज्ञानाचा समावेश केला जात आहे, ज्यामुळे कंट्रोलरूममधूनच गळती व अनधिकृत कनेक्शन शोधणे शक्य होईल.यावेळी सदस्य अनिल परब, भाई जगताप, प्रवीण दरेकर यांनी चर्चेत सहभाग घेतला.





'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024